# अतिवृष्टीमुळे ५७ जनावरांचा मृत्यू; ४१९ घरांचे नुकसान

## नवापूर तालुक्यातील स्थिती; मदतकार्य सुरू

**नवापूर, जि. नंदुरबार (प्रतिनिधी)** : तालुक्यात शुक्रवारी (ता. १७) पहाटे झालेल्या अतिवृष्टीने तीन महिला व दोन पुरुषांचा बळी घेतला; तर ५७ जनावरेही या पावसात दगावली. नवापूर, विसरवाडी, बोकळझर, चौकी या भागातील ४१९ घरांचे नुकसान झाले. शनिवारी सकाळपासून ठिकठिकाणी नुकसानाचे पंचनामे सुरू असून, प्रशासन आणि स्थानिक नागरिकांकडून आपद्ग्रस्तांना मदत करण्यात येत आहे. शनिवारी (ता. १९) नुकसानग्रस्त भागात दुरुस्ती व दिलासा देण्यासंबंधीची कार्यवाही प्रशासन राबवित होते. जिल्हाधिकारी शुक्रवारी पहाटेपासून या भागात मुक्कामी असून, पोलिस व जिल्हा प्रशासनातील शेकडो कर्मचारी या भागात मदतकार्य करीत आहेत.

तालुक्यात गुरुवारी (ता. १६) रात्री अकरापासून पाऊस सुरू झाला. त्यात रंगावली नदीच्या वरच्या भागात अधिक पाऊस झाल्याने नदीला पूर आला. पहाटेची वेळ असल्याने रंगावलीचे रौद्ररूप लवकर लक्षात आले नाही. पहाटे साडेतीनला करंजी ओवारा (नई होंडा) या नव्या आणि उंच पुलावरून पाणी वाहण्यास सुरवात झाली. नागरिकांनी एकमेकांना भ्रमणध्वनीद्वारे अतिवृष्टीची माहिती दिली. नदीकिनाऱ्यावरील घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांची धावपळ सुरू झाली होती. रात्रीची वेळ असल्याने अपेक्षित मदत मिळणे शक्य झाले नाही. पहाटे चारला जिल्हाधिकारी डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, प्रांताधिकारी डॉ. अर्चना पठारे यांना माहिती मिळताच त्यांनी विसरवाडी आणि नवापूरला भेट दिली.

नवापूर येथील नदीकिनारी असलेल्या भगतवाडी भागातील रहिवासी सईदा हुसेन काखर (नवापूर), जामनाबाई लाशा गावित (बालहाट, ता. नवापूर) या दोघी पुरात वाहून गेल्याने मृत्युमुखी पडल्या. त्यांचे मृतदेह सापडले. याशिवाय वंतीबाई बोदल्या गावित (खोकसा) यांच्या अंगावर घर पडल्याने त्यांचा मृत्यू झाला. वाघळापाडा (ता. नवापूर) येथील काशिराम बाबजी गावित हे नागझरी डॅमच्या सांडव्यावरून जात असताना पाय घसरून पुराच्या पाण्यात वाहून गेले. त्यांचाही मृतदेह आढळून आला. अन्य एका पुरुषाचाही मृतदेह सापडला असून, त्याची ओळख अद्याप पटली नाही. इतर मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींवर शनिवारी अंत्यसंस्कार झाले. तसेच, तातडीची मदत म्हणून संबंधित कुटुंबीयांना निधीचे वितरण प्रशासनाने केले.

नवापूरमध्ये अल्टो कार, चारचाकी वाहन व ट्रकही पुराच्या पाण्यात वाहून गेला. चिंचपाडा येथे तीन म्हशी, बोकळझरमध्ये एक म्हैस, एक गाय, विसरवाडीला १३ म्हशी, १६ शेळ्या, ३ कोकरे, एक घोडा, पानबाऱ्याला ४ बैल, ३ गायी, एक वासरू, उंचीशेवडीला एक बैल, बर्डीपाडाला दोन शेळ्या, नवापूरला आठ शेळ्या अशी ५७ जनावरे या पावसात मरण पावली. घरांचीही मोठ्या प्रमाणात पडझड झाली असून, विसरवाडीत ३८, नवापुरात २८२, करंजी बु. येथे ४१, बोकळझर येथे ३३, धनराट येथे २५ अशा एकूण ४१३ घरांची पडझड नोंदविण्यात आली आहे. सुरत- नागपूर महामार्गावरील शहरातील पूल, करंजी ओवाराचा (नई होंडा) उंच पुलावरून पाणी वाहत असल्याने नवापूर शहराकडे येणारे सर्व मार्ग बंद झाले होते. परिणामी राज्य परिवहन महामंडळाच्या नवापूर आगारातील सर्व बस शनिवारी दुपारपर्यंत बंद होत्या.

### हे रस्ते आहेत ठप्प

पुलाचा जोड रस्ता वाहून गेल्याने अहवा, रायपूर, सावरट, अंजाने, खांडबारा, धानोरा रस्ता व करंजवेल, डोकारे, दुधरे, बिलबारा, भरडू, केळी, तिळासर रस्ता ठप्प झाला; तर नयाहोंडा व बंधारपाडा गावांदरम्यान पुलाचा जोड रस्ता वाहून गेल्याने विसरवाडी, वडसत्रा, चोरविहिर, ढोंग सागाळी, श्रावणी, बोरचेक, वाघदे रस्ता बंद झाला. केवडीपाडा ते सुतारपाडा गावांदरम्यान रस्त्याचा भराव वाहून गेल्याने कोंडाईबारी, पिंजारझाडी, पांगणवालवे, विटावे, केवडीपाडा, वाघाळे हा रस्ताही ठप्प आहे. दुरुस्तीचे काम शनिवारी वेगात सुरू होते. परंतु दुपारपर्यंत काम फारसे पूर्ण झालेले नव्हते.

# धुळ्यात काही ठिकाणी जोरदार पाऊस

**जळगाव (प्रतिनिधी)** : खानदेशात शनिवारी (ता.१८) सकाळी आठपर्यंतच्या २४ तासांत अनेक तालुक्यांमध्ये पाऊस झाला नाही. काही ठिकाणी मात्र जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. तापी नदी व गिरणा नदीच्या काठावरील सर्वच गावांमध्ये जोरदार पाऊस झाला असून, या भागात वाफसा मोडला आहे. वाफसा नसल्याने खते देणे, तण नियंत्रण आदी कामे ठप्प आहेत.

शनिवारी सकाळपर्यंत शिरपूर, साक्री, पाचोरा, भडगाव, जामनेर, अमळनेर आदी ठिकाणी पाऊस झाल्याचे वृत्त आहे. धुळे, शिंदखेडा, जळगाव, भुसावळ, मुक्ताईनगर, रावेर, यावल, चोपडा भागांत पाऊस झाला नाही. धुळे जिल्ह्यातील साक्री व परिसरात जोरदार पाऊस झाला. या भागातील नाले व नद्यांना पूर आला आहे. मागील २४ तासांत साक्रीत २५, पाचोऱ्यात १८, चाळीसगावात २०, अमळनेरात १८, पाचोरा येथे १४, भडगावात १६ मिलिमीटर पाऊस झाला. गुरुवारी (ता.१६) अतिवृष्टी झाल्यानंतर पुन्हा हा पाऊस झाला आहे. शनिवारी सकाळी आठपर्यंत कुठेही अतिवृष्टी झालेली नसल्याची माहिती मिळाली. चोपडा तालुक्यातही तापी नदीकाठी काही गावांमध्ये पाऊस झाला, परंतु त्याची नोंद झालेली नव्हती. धुळे जिल्ह्यात काही ठिकाणी चांगला पाऊस झालेला असला तरी शिरपूर व शिंदखेडा भागात जोरदार पावसाची प्रतीक्षा आहे.

पांझरा नदीला पूर आलेला नाही तर प्रमुख प्रकल्पही कोरडे आहेत. हतनूर धरणाचे जवळपास सर्वच दरवाजे उघडल्याने तापी नदीला पूर आला आहे. हलक्या मुरमाड जमिनीत खते देण्यासह इतर कामे शेतकरी करीत आहेत. परंतु तापी व गिरणा नदीकाठच्या गावांमध्ये काळी कसदार जमीन असल्याने या भागात वाफसा नाही. खते देणे, तण नियंत्रण आदी कामे ठप्प झाली आहेत.

## चाळीसगाव परिसरात पिकांमध्ये साचले पाणी

**चाळीसगाव** : परिसरात गिरणाकाठ व इतर भागांत कापूस पिकात पाणी साचले आहे. अनेक दिवसांनंतर पाऊस नव्हता. त्यात अचानक जोरदार पाऊस आला. पाणी साचल्याने पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. सध्या कोरडवाहू कापसाचे पीक दोन फुटांचे आहे. त्याला पाते, फुले लागतील. परंतु काही भागांत जोरदार पावसाने पाते व फुले गळण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. तसेच भाजीपाला पिकांतही पाणी साचल्याने त्यांची काढणी बंद करावी लागली आहे. शेतात चिखल आहे. यामुळे शेतकऱ्यांनी भाजीपाला काढणी व इतर कामे बंद केली आहेत.

सकाळ अॅग्रोवन — आयोजित | महाधन — प्रायोजित

सकाळ अॅग्रोवन संवाद

**‘अॅग्रोवन’ साधणार शेतकऱ्यांशी संवाद**

**कार्यक्रम वेळापत्रक**

**जळगाव - सोमवार, २० ऑगस्ट २०१८ रोजी**

**विषय** – कापूस व केळी पीक परिसंवाद
**वक्ते – डॉ. संजीव पाटील,** (शास्त्रज्ञ, तेलबिया संशोधन केंद्र जळगाव)
**श्री. नजीम शेख,** (प्रमुख, केळी संशोधन केंद्र जळगाव)
**स्थळ** – विठ्ठल मंदिर सभागृह, वरखेडे बु, ता. चाळीसगाव, जि. जळगाव
**वेळ** – सकाळी ८.३०

**धुळे - सोमवार, २० ऑगस्ट २०१८ रोजी**

**विषय** – कांदा लागवड तंत्रज्ञान व व्यवस्थापन
**वक्ते – प्रा. श्रीधर देसले,**
( सहायक प्राध्यापक, कृषी विद्यावेत्ता, कृषी विस्तार केंद्र)
**स्थळ** – विठ्ठल रुक्मिणी मंदिर सभागृह, मु. पो. वडणे, ता. जि धुळे, **वेळ** – सायं. ६ वा.

**या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.**

# नियोजनाअभावी १२० कोटींचा निधी पडून

## जिल्हा परिषदेत भाजपमधील अंतर्गत कलहाचा परिणाम

**जळगाव (प्रतिनिधी)** : जिल्हा परिषदेत पुन्हा एकदा भाजपमधील अंतर्गत कलहसमोर आल्याने जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त झालेल्या निधीचे नियोजन चार महिन्यांपासून रखडले आहे. हे वाद असेच सुरू राहिले तर मागील वर्षासारखाच विकासकामांवर परिणाम होऊ शकतो, असे सदस्यांचे म्हणणे आहे. १२० कोटी रुपयांचा निधी नियोजनाअभावी पडून असल्याची स्थिती आहे.

काही दिवसांपूर्वी उपाध्यक्ष नंदकिशोर महाजन यांनी आपल्याच पक्षाच्या सदस्य तथा अध्यक्ष उज्वला पाटील यांच्याबाबत जाहीर नाराजी व्यक्त करीत अध्यक्ष या जळगावपेक्षा मुंबईला अधिक असतात. त्या तेथून कारभार पाहतील तर जिल्हा परिषदेचा कारभार कसा चालणार, असा प्रश्न पत्रकारांशी बोलताना उपस्थित केला होता.

त्यातच अध्यक्षांची बाजू त्यांच्या पक्षातील कुणीच सावरलेली दिसत नाही. शिवसेनेच्या सदस्या कल्पना पाटील यांनी अध्यक्षांचा बचाव करीत सर्वपक्षीय गटनेते व सर्व सभापती हेच अध्यक्षांवर दबाव आणत असतात. म्हणून नियोजन रखडते. इतर सदस्यांवर अन्याय होतो, असा आरोप केला आहे. यामुळे आणखी नव्या वादाला तोंड फुटण्याची स्थिती जिल्हा परिषदेत आहे, तर विरोधात असलेले राष्ट्रवादी कॉंग्रेस व शिवसेनेचे गटनेते हे सत्ताधाऱ्यांसोबत असल्याची चर्चाही शिवसेनेच्या सदस्य पाटील यांनी केलेल्या आरोपानंतर वाढू लागली आहे. गेल्या वर्षीही सत्ताधारी भाजपमध्ये कलह वाढतच होते. पोषण आहार व इतर प्रकरणांवरून स्वकीयच भाजपला अडचणीत आणत होते. एकामागून एक प्रकरणे समोर आणण्यात भाजपचेच सदस्य पुढे होते. पदाधिकाऱ्यांमध्ये अंतर्गत वाद होते. यामुळे जो निधी मिळाला, त्याचे नियोजन डिसेंबरमध्ये झाले, मग कामे फेब्रुवारीत सुरू झाली. मार्च महिना उजाडला, तरी अनेक विषय मार्गी लागले नव्हते. यंदाही तशीच स्थिती असून, भाजपमधील गटबाजी वाढत असतानाच शिवसेनेतील अंतर्गत वाद समोर येऊ लागले आहेत. प्रशासन याचा लाभ घेत असून, त्यांच्यावर कुणाचेही नियंत्रण सध्या नसल्याची स्थिती आहे.

## सरदार सरोवर बाधितांचे हाल कायम

**नंदुरबार** : अक्कलकुवा व परिसरातील सरदार सरोवर बाधितांना अजूनही न्याय मिळालेला नाही. मध्यंतरी यासंबंधी जिल्ह्यात आंदोलन झाले. प्रशासनाला निवेदन देण्यात आले. अनेक आदिवासी बांधव या प्रकल्पामुळे बाधित झाले असून, त्यांचे व्यवस्थित पुनर्वसन, शाळांची व्यवस्था, आरोग्य याबाबत कार्यवाही करण्याची गरज आहे. परंतु त्याकडे राज्य सरकार व गुजरात सरकार दुर्लक्ष करीत आहे.

गुजरात सरकारने हा प्रकल्प बांधला आहे. त्याचे बॅकवॉटर अक्कलकुवापर्यंत आहे. काही सामाजिक संस्थांनी बाधितांसाठी शाळा व आरोग्य सुविधांची व्यवस्था केली आहे. परंतु सरकारचा सक्रिय सहभाग हवा आहे. तरंगता दवाखाना सेवा पुरेशी नाही.

अनेकदा या भागातील प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक येत नाहीत. शाळा बंद असतात, असे सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.